

समईच्या शुभ्र कळ्या....लक्ष्मीपूजनाची तळपती....
दिवाळीच्या पणतीने... दाही दिशा झळकती....

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड



www.surajyadigital.com | सोमवार दि.२४ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : २७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# रोहित सेनेने पाकचा माज उतरवला, विराटच्या जिगरबाजीने विजय साकारला

- तिकडे तिरंगा ध्वजांची लाट उसळली,
- इकडे आतषबाजीने भारतभूमी उजळली

सुराज्य/मेलबर्न

कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने टी २० विश्व चषकाच्या वर्ल्डकप स्पर्धेत पारंपरिक कडवा प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानच्या नांग्या ठेचत ऑस्ट्रेलियातील मेलबर्नच्या मैदानावर पहिली विजयी पताका रोवली. काळजाची धडधड वाढवलेल्या या सामन्यात माजी कर्णधार विरोट कोहली हा सिकंदर ठरला. त्याच्या जिगरबाज खेळीने विजय आमचाच अशा मस्तीत असलेल्या पाक संघाचा माज उतरवला. त्याला मोलाची साथ लाभली तमाम भारतीयांचा लाडका असलेल्या हार्दिक पांड्याची. शेवटच्या षटकातील अखेरच्या चेंडूवर एक धाव हवी असताना आर.अश्विनने विजयी चौकार ठोकल्यानंतर कांगारूंच्या मैदानात तिरंगा ध्वज डौलाने फडकले तर इकडे भारतात फटाके फोडून चक्क दिवाळीच साजरी झाली. मागील विश्वचषकातील आणि आशिया कपमधील पराभवाचा रोहित सेनेने बदला घेत भारतीयांच्या मनातील खदखद धुवून काढली.



भारताने पाकिस्तानचा ४ गडी राखून पराभव केला. विराट कोहलीच्या नाबाद ८२ धावा भारताच्या विजयाचे वैशिष्ट्य ठरल्या. पाकिस्तानने दिलेल्या १६० धावांचे आव्हान घेऊन फलंदाजीसाठी आलेल्या भारताला सुरुवातीला जोरदार धक्के दिले. त्यामुळे भारताची अवस्था ४ बाद ३१ अशी झाली.त्यावेळी भारतीयांचे टेन्शन वाढले. यानंतर विराट कोहलीने हार्दिक पांड्याच्या साथीने डाव सावरताच भारतीयांचा जीव भांड्यात पडला आणि विजयाच्या आशा पल्लवित झाल्या. रन-मशीन विराट कोहलीने टीम इंडियाला वाचवण्यासाठी पाकिस्तानविरुद्धच्या हाय-व्होल्टेज लढतीत आपली झंझावाती खेळी दाखवली.दहा षटके संपल्यानंतर प्रति षटकांमागे १२ धावांची गरज होती. हे आव्हान पेलवेल की नाही,अशी शंका भारतीयांना होती परंतु विराटने शांत डोक्याने खेळी करून मोक्याच्यावेळी चौकार व षटकारांची आतषबाजी केली. कोहलीने मॅचविनरची जोखीम घेत पाकिस्तानकडून विजय हिसकावून घेतला.



## रणनीतीचे गुपित...

पांड्यासोबत शतकी भागिदारी करत कोहलीने भारताला विजय मिळवून दिला. पॉवरप्लेमध्ये उडालेली दाणादाण पाहता विजय अशक्यप्राय वाटत होता. हा सामना कुठे अन् कसा फिरला ते विराट कोहलीने सामना संपल्यानंतर इरफान पठाण आणि जतीन सप्रू या समालोचकांशी बोलताना सांगितले. हार्दिक फलंदाजीला आला, त्यावेळी आमची परिस्थिती बिकट होती. स्ट्राईक रोटेट करायचा. एखादा खराब चेंडू मिळाल्यावर चौकार, षटकार ठोकायचा हीच आमची रणनीती होती. खेळपट्टीवरील हे गुपित विराटने सांगितले.

## हायव्होल्टेज झुंज...

विराट भाई हो जाएगा, हो जाएगा, असे हार्दिक मला सातत्याने सांगत होता. शेवटच्या ३ षटकांमध्ये ५० धावा होत्या. यातील एक षटक हारिस रौफ टाकणार ते आम्हाला माहीत होते. रौफवर हल्ला चढवला तर पाकिस्तानचा संघ पॅनिक होणार हे मी हार्दिकला सांगितले, अशा शब्दांत कोहलीने हायव्होल्टेज सामन्यातील संवाद सांगितला.

## अन् लक्ष्य आवाक्यात आले...

रौफ गोलंदाजी करताना ८ चेंडूंत २८ धावांची गरज होती. त्यावेळी मी स्वत:ला एक गोष्ट सांगितली. आता २ चेंडूंमध्ये २ षटकार ठोकायलाच हवेत. अन्यथा आपण सामना हरू. मग पुढच्या २ चेंडूंवर २ षटकार ठोकले आणि लक्ष्य आवाक्यात आले, असे कोहली म्हणाला. अक्षर पटेल धावबाद झाला त्यावेळी पांड्या फलंदाजीला आला. त्यावेळी आमची अवस्था वाईट होती. हा सामना शेवटपर्यंत न्यायचा हीच आमची रणनीती होती, असे कोहलीने सांगितले.

## अद्भूत आनंद आणि गळाभेट...

भारताने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळविल्यानंतर रोहित शर्माने विराट कोहलीमधील एक अद्भुत क्षण पाहायला मिळाला.कोहलीने विजय मिळवून दिल्याने, भारताचा कर्णधार रोहितने त्याच्या या सामन्यातील विजयी खेळीबद्दल फलंदाजाचे अभिनंदन करतानाचा एक मिलियन डॉलर क्षण सर्वांना पाहायला मिळाला.कोहलीला घट्ट मिठी मारताना रोहितने कोहलीला उचलूनच घेतले. या खेळाच्या दोन आयकॉन्समधील बॉन्डिंग काहीच क्षणात सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला. या सामन्याबद्दल बोलायचे तर, कोहलीने ८२ धावा तडकावल्या तर अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याने भारताच्या विश्वचषकातील सलामीच्या सामन्यात ३७ चेंडूत ४० धावा केल्या. सर्वात लहान फॉरमॅटमध्ये १००० धावा आणि ५० बळी घेणारा पहिला भारतीय ठरला.






राष्ट्रवादी काँग्रेस
महिला आघाडी
सोलापूर जिल्हा

मा. सुवर्णताई झाडे

यांची सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या
कार्याध्यक्षपदी निवड झाल्यानिमित्त
तसेच वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!







शुभेच्छुक
किशोर गोविंद माळी
अध्यक्ष-माऊली प्रतिष्ठान, सोलापूर
अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, सोलापूर